**QP CODE : 29125**

**वेळ : 2 तास** **गुण : ६०**

सूचना : (१) **सर्व प्रश्न** सोडविणे **आवश्यक**.

(२) **सर्व** प्रश्नांना **समान गुण.**

**प्रश्न १ ला** : 'लेखकाची जीवनदृष्टी त्याच्या प्रतिभाधर्मावर परिणाम करत असते'', या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

'लेखकाचे वाङ्मयीन स्थान त्याच्या प्रतिभाधर्मावरून ठरत असते व त्यातूनच त्याचे ऐतिहासिक मूल्यमापन होते.' या विधानाची चर्चा करा.

**प्रश्न २ रा** : 'परंपरा आणि नवता' या टीकात्मक स्फुट लिखाणाचे वाङ्मयीन वेगळेपण विशद करा.

**किंवा**

'परंपरा ही चोखंदळपणे स्वतःशी सुसंगत असलेल्या गोष्टींची निवड करत असते.' या विधानाची चर्चा 'परंपरा आणि नवता' या टीकात्मक स्फुट लिखाणाच्या अनुषंगाने करा.

**प्रश्न ३ रा** : 'स्पर्शाची पालवी' या ललित निबंधांमधून गो.वि.करंदीकरांची नाजूक व तरल संवेदनेची उत्कटता जागोजागी कशी प्रकटते, ते साधार स्पष्ट करा.

**किंवा**

'स्पर्शाची पालवी' या ललित निबंधांमधून अनुभवांना साजेसे घाट शोधण्यासाठी नवनवीन प्रयोग करण्याची शक्तीस्थळे या लिखाणात कसे आढळून येतात, ते स्पष्ट करा.

**प्रश्न ४ था** : खालीलपैकी प्रत्येक गटातील **एक** टीप लिहा.

अ. १ चरित्रात्मक . लेखकाभ्यासाच्या पद्धतीच्या मर्यादा

२. लेखकाचे ऐतिहासिक भान

आ. १. 'परंपरा आणि नवता' मधील आत्मनिवेदनपर लेख

२. केशवसुतांच्या कवितेचे मूल्यमापन

इ. १.'स्पर्शाची पालवी' मधून व्यक्त होणारी तरलता

२. .'स्पर्शाची पालवी' या ललित निबंधांमधून व्यक्त होणारी उत्कटता व तर्ककठोर समीक्षा.

-------------------------------------